कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयः, (रामटेक) महाराष्ट्रम्

रामटेक कार्यालय–प्रशासकीय भवन, मौदारोड, रामटेक– 441106, जि.नागपूर

नागपूर कार्यालय–शैक्षणिक परिसर, पाचवा माळा, ना.सु.प्र. संकुल, मोरभवनजवळ, नागपूर–12.

Ramtek: Ph. 07114-256476, Fax. 255549 Nagpur: Ph. 0712-2248094

पत्र क्र. ककासंवि/व्हीसीओ/ज.सं./2020/11 **दि. : 10/01/2020**

प्रो. देवीसहाय पाण्डेय, प्रो. कंदाडै रामानुजाचार्य आणि पं. मणिशास्त्री द्रविड यांना

''महाकवी कालिदास संस्कृतव्रती राष्ट्रीय पुरस्कार'' प्रदान

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाद्वारे दरवर्षी **पं. रामनारायण शर्मा वैद्य यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पं. रामनारायण शर्मा आयुर्वेद संशोधन प्रतिष्ठान, स्थानिक जिल्हा प्रशासन आणि महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने** ''**महाकवी कालिदास संस्कृत–व्रती राष्ट्रीय पुरस्कार**'' प्रदान केला जातो. **महाकवी कालिदास संस्कृत–व्रती राष्ट्रीय पुरस्कार आज शुक्रवार, दि. 10 जानेवारी 2020 रोजी प्रदान करण्यात आले.**

कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी यांच्या आध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या पुरस्कार सोहळयाला **प्रमुख अतिथी म्हणून मा. केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी, श्री. हरिश्चंद्र अग्रवाल, मुख्य अधिकारी, डाक विभाग (पोस्ट मास्टर जनरल)** बैद्यनाथ प्रतिष्ठानचे व्यवस्थापकीय संचालक **श्री. सुरेश शर्मा**, श्री. रमेश शर्मा , नागपूरचे जिल्हाधिकारी **श्री. रवीन्द्र ठाकरे**, महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक **श्री. प्रशांत सवाई,** विशेषत्वाने उपस्थित होते.

ज्या विद्वज्जनांनी संस्कृत भाषेच्या प्रचार, प्रसार, विकास तसेच संशोधनासाठी आयुष्यभर सेवा केली त्यांचा यथोचित गौरव व्हावा हा प्रस्तुत पुरस्कार प्रदान करण्यामागचा उद्देश आहे. समाजात संस्कृत भाषेला गौरवयुक्त स्थान मिळवून देण्यात ज्यांनी अमूल्य योगदान प्रदान केले अशा महान विभूतींना महाकवी कालिदास संस्कृत–व्रती राष्ट्रीय पुरस्कार विश्वविद्यालयाकडून दिला जातो.

2019 चा ज्येष्ठ संस्कृत विद्वान् संवर्गात संस्कृत पंडित व वेदभाष्यकार प्रो. देवीसहाय पाण्डेय तसेच प्रख्यात वेदान्त, व्याकरणशास्त्रपंडित प्रो. कंदाडै रामानुजाचार्य, हैद्राबाद आणि युवा संस्कृत विद्वान् संवर्गात प्रख्यात न्याय व वेदान्त शास्त्र पंडित प्रो. मणिशास्त्री द्रविड, चेन्नई यांना प्रस्तुत पुरस्कार मान्यवरांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. शाल, चंदनहार, सन्मानपत्र, भेटवस्तू व रोख पुरस्कार असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

सन्मानपत्राचे वाचन डॉ. रेणुका बोकारे, डॉ. पराग जोशी व डॉ. दिनकर मराठे यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. दिनकर मराठे, डॉ. पराग जोशी यांनी केले. वंदे मातरम् ने सांगता झाली.

परिषदेच्या 50 व्या अधिवेशनानिमित्त बैद्यनाथ प्रतिष्ठानचे संचालक श्री. सुरेश शर्मा यांनी तीनही पुरस्कार्थींना 50000/— रू. देण्याचे जाहीर केले.

स्वा/—

जनसंपर्क अधिकारी